

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# मुख्यमंत्री
## फेलोशिप कार्यक्रम
## २०१६

महाराष्ट्राचे **मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस** यांनी युवकांना प्रशासनात सहभागी करून घेण्याच्या उद्देशाने 'मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम २०१६' ची घोषणा केलेली आहे. कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या युवकांना त्यांच्या विकासासाठी आवश्यक अनुभव व कौशल्य या कार्यक्रमाच्या माध्यमातून प्राप्त होईल.

दिनांक २० मे, २०१६ रोजी किमान वय २१ वर्षे व कमाल वय २५ वर्षे असणारे, कोणत्याही शाखेचे पदवीधर/पदव्युत्तर पदवीधर (किमान ६० टक्के गुणांसह) आणि नामांकित संस्था, उद्योग वा सार्वजनिक उपक्रम संस्थेतील किमान एक वर्षाचा अनुभव असणारे उमेदवार अर्ज करू शकतील. कार्यक्रमाचा कालावधी ११ महिने असेल व उमेदवाराला आकर्षक विद्यावेतन दिले जाईल.

कार्यक्रमाचा अधिक तपशील जाणून घेण्याकरीता व 'मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम २०१६' करीता अर्ज करण्यासाठी https://mahades.maharashtra.gov.in वा https://www.maharashtra.gov.in या संकेतस्थळास भेट देऊन ऑनलाईन अर्ज करावेत. ऑनलाईन अर्जाची सुधारित मुदत दि. १५/०६/२०१६, वेळ २३:५९ पर्यंत अशी आहे.